# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक ३०/०५/२०२२ (सोमवार)**

**(दुपार)**

---

### पो.स्टे. खापरखेडा हद्दीत ए.टी.एम फोडण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला अटक
### स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामिण ची कारवाई...

दि. २६/०४/२०२२ चे १९.१८ वा. फिर्यादी नामे– राहुलकुमार उध्दवराव शंभरकर वय ३९ वर्ष, रा. ओम नगर, संत जगनाडे हाउसिंग सोसायटी नागपुर यांनी पो.स्टे. खापरखेडा येथे येवून रिपोर्ट दिली की, सिल्लेवाडा पोस्ट ऑफीस समोर येथे दि. २६/०४/२०२२ चे ०२.२० वा. ते २६/०४/२०२२ चे ०३.०० वा. चे सुमारास युको बॅकेचे एटीएम चा रुम मधील उघडा दारातुन अज्ञात आरोपीने प्रवेश करुन मशीन फोडन्याचे प्रयत्न केले. त्याला पैसे चोरी करता आले नाही मशीन फोडुन चोरीचा प्रयत्न करुन मशीनचे नुकसान केले. त्यावरून पो.स्टे. खापरखेडा येथे अज्ञात आरोपी विरूद्ध अप क्र. २३६/२०२२ कलम ३८०, ५११, ४२७ भादवि कायद्यान्वे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाचे अनुषंगाने संमातर तपासाचे दिलेले आदेशान्वये दिनांक २९/०५/२०२२ रोजी स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामिण चे पथक पो.स्टे. खापरखेडा हद्दीत अवैध धंदयावर आळा घालनेकामी पेट्रोलिंग करीत असतांना मिळालेल्या गोपनिय माहितीच्या आधारे पोलीस स्टेशन खापरखेडा येथे दाखल असलेला अप क्र २३६/२०२२ कलम ३८०,५११,४२७ भादवि गुन्ह्यातील संशयीत आरोपी नामे– राहुल रमेश तायवाडे, वय २२ वर्ष, रा. वॉर्ड क्र. ४, सिल्लेवाडा यास ताब्यात घेऊन सखोल विचारपूस केली असता त्याने गुन्हा केल्याचे कबुल केल्याने आरोपीस पुढील कारवाई करिता पोलीस स्टेशन खापरखेडा चे ताब्यात देण्यात आले.

सदरची कार्यवाही मा.पोलीस अधीक्षक श्री. वियजकुमार मगर नागपुर ग्रामीण, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणीकर ना. ग्रा. यांचे आदेशान्वये स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री ओमप्रकाश कोकाटे यांचे मार्गदर्शनात सपोनि अनिल राऊत, पोहवा विनोद काळे, नाना राऊत, अरविंद भगत, पोना वीरेंद्र नरड, शैलेश, प्रणय व चालक साहेबराव बहाळे यांनी पार पाडली.




पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर